**महाराष्ट्र शासन**
**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ०२३.**
**दुरध्वनी क्र.** :- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३ **फॅक्स क्र.** :- २२६४४६३८
**संकेतस्थळ** - www.dol.maharashtra.gov.in **ई-मेल** :- director.dol@ maharashtra.gov.in

जा. क्र.-४/ग्रंथखरेदी सुटदर/२०१७-१८/२४२९-७८ दि२/६/२०१७

**वाचा: १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग-२, दि. १७/४/२०१५.**
**२. ग्रंथखरेदीसाठी सुटदर निश्चित करण्याबाबतच्या दि.३१/५/२०१७च्या बैठकीचे इतिवृत**

**आदेश:-**

ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय ग्रंथालयांकडून होणाऱ्या ग्रंथखरेदीच्या सुटदरात एकरुपता रहावी म्हणून संचालनालयाकडून सुटदरपत्रके मागविणारी निविदावजा जाहिरात राज्यातील विविध विभागांतील वृत्तपत्रांतून प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क विभागास देण्यात आली होती. तसेच सदर निविदावजा जाहिरात शासनाच्या व संचालनालयाच्या संकेत स्थळावरही प्रदर्शित करण्यात आलेली होती. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांच्या आधारे सुटदर निश्चित करण्यात आले. त्यानुसार ग्रंथालय संचालनालयामार्फत २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी सर्व शासकीय ग्रंथालयांसाठी खालील तक्त्यात निश्चित केलेल्या सुटदराप्रमाणे ग्रंथखरेदी करणे बंधनकारक राहील. या सुटदरानुसार सर्व प्रकारच्या प्रकाशनांवर (शासकीय प्रकाशने वगळून ) खालीलप्रमाणे जास्तीत जास्त सुट **दुर्वा एजन्सीज, २१८, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२ यांच्या दरपत्रकामध्ये नमुद असल्याने** बैठकीमधे सर्वानुमते मान्य करण्यात आले. सदर पुरवठादाराकडून राज्यातील ४३ शासकीय ग्रंथालये सर्व प्रकारचे वाचन साहित्य खरेदी करु शकतील किंवा याच दराने जर कोणीही पुरवठादार, प्रकाशक, वितरक, विक्रेता खालीलप्रकारच्या वाचनसाहित्यावर तक्त्यात उल्लेखित केल्याप्रमाणे सुट देण्यास तयार असतील तर त्यांच्याकडूनही वाचनसाहित्य खरेदी करण्यास मुभा राहील.

या मान्य केलेल्या सुटदरानूसार केलेल्या ग्रंथखरेदीचा अहवाल दरमहा संचालनालयास सादर करावा. एखाद्या विशिष्ट ग्रंथ वा ग्रंथाच्या बाबतीत या दराने सुट मिळणे शक्य नसेल वा त्यापेक्षा कमी सुटदराने घेण्याबाबतचे विवक्षित प्रकरण संचालकांकडे सादर केल्यास त्यांच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**सन २०१७-१८ साठी ग्रंथखरेदी सुटदर**

| अ. क्र. | भाषा / विषय | मराठी | हिंदी | इंग्रजी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | ललित | ३५% | ३५% | ३५% | राज्यातील सर्व ४३ शासकीय ग्रंथालयांकरीता करण्यात येणारी ग्रंथ खरेदी या सुट दराने करण्यात येईल. |
| २) | सर्वसामाजिक शास्त्रे | ३५% | ३५% | ३५% | |
| ३) | नवसाक्षरांचे साहित्य | ३५% | ३५% | ३५% | |
| ४) | बालवाङ:मय/वाङ:मयेतर सर्व विषय | ३५% | ३५% | ३५% | |
| ५) | शासकीय प्रकाशने | - | - | - | |
| ६) | संदर्भ ग्रंथ | ३५% | ३५% | ३५% | |
| ७) | स्पर्धा परीक्षा | ३५% | ३५% | ३५% | |

(कि. ग. धाडोरे )
**ग्रंथालय संचालक**

प्रति,

१) **प्र. ग्रंथपाल वर्ग-१** राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई
२) **प्र. ग्रंथपाल वर्ग-१**, शासकिय विभागीय ग्रंथालय,नागपूर/पुणे
३) **ग्रंथपाल वर्ग-२**, शासकिय विभागीय ग्रंथालय,अमरावती /औरंगाबाद/नाशिक /रत्नागिरी
४) **सहाय्यक ग्रंथालय संचालक**, अमरावती/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/पुणे/मुंबई (कोकण विभाग)
५) **प्र. ग्रंथपाल वर्ग-२** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती संदर्भ ग्रंथालय, दापोली
६) **जिल्हा ग्रंथालय अधिकारी**, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,मुंबई शहर/मुंबई उपनगर/ ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/पुणे/कोल्हापूर/सातारा/सांगली/सोलापूर/नाशिक/धुळे/अहमदनगर/ नंदूरबार/जळगाव/औरंगाबाद/जालना/परभणी/लातूर/नांदेड/बीड/उस्मानाबाद/हिंगोली/गोंदिया/ गडचिरोली /वाशिम/अमरावती
७)**जिल्हा ग्रंथपाल**, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,अकोला/यवतमाळ/बुलढाणा/वर्धा/चंद्रपूर/नागपूर/भंडारा